**पेनटाकळी प्रकल्प ता. मेहकर जि. बुलडाणा**

या प्रकल्पास चतुर्थ सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रदान करणे बाबत. किंमत रु ४१६.५९कोटी.

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.

**महामंडळाचा निर्णय क्र. ८७ /विपाविमं/कातां.३(२)/पेनटाकळी/चतुर्थ सु.प्र.मा./ (धा.क्र.- -२१ ). दिनांक ३०/०४/२०२१.**

संदर्भ :
१. महामंडळाचा निर्णय क्र. विपाविम/कातां ३/५५०/पेनटाकळी, दिनांक २४/०६/२००९
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/ पेनटाकळी/ (धा.क्र.७/२०१७)/८८७/२०१९, दि. २४/०९/२०१९.
४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.१२/०२/२०२१ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०२१/ (८१/२०२१)/लपा, दि. २३/०३/२०२१.
५. विपाविम नियामक मंडळाच्या दि. १२/०४/२०२१रोजी झालेल्या ८०व्या बैठकीतील ठराव क्र. ८०/३.

**प्रस्तावना :**

पेनटाकळी प्रकल्प् हा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत गोदावरी खोऱ्यातील पैनगंगा उपखोऱ्यात बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील पैनगंगा नदीवर पेनटाकळी गावाच्या वरील बाजूस बांधण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प् सर्वसाधारण क्षेत्राचा आहे. या प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र ९८८४ हेक्टर असून त्यापैकी बुलडाणा जिल्ळयातील ९२३६ हेक्टर व वाशिम जिल्ह्यातील ६४८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

पेनटाकळी प्रकल्प ता. मेहकर जि. बुलडाणा, या प्रकल्पाच्या, रु.२३०.२७ कोटी किंमतीचा (दरसूची २००७-०८) तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये तृतीय सुप्रमा प्रदान करण्यात आली होती.

बांधकामाच्या दरम्यान योजनेच्या खर्चात दरसूचीतील बदलामुळे झालेली वाढ, भुसंपादन खर्चातील वाढ, इतर कारणे व अनुषंगीक खर्चातील वाढ इत्यादी कारणांमुळे वाढ झाली झाली असुन प्रकल्पाची अद्यावत किंमत तृतीय सुप्रमा किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे प्रकल्पास चतुर्थ सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

पेनटाकळी प्रकल्प ता. मेहकर जि. बुलडाणा, या प्रकल्पाच्या, रु.४१६.५९ कोटी किंमतीचा (दरसूची २०१७-१८) चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्या दिनांक ११/०९/२०१९ रोजी झालेल्या १३७ व्या बैठकीत राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिकच्या छाननी अहवालातील मुद्या क्र.१ ते २७ च्या अधीन क्लिअरन्स बाबतचा निर्णय झाला.

छाननी अहवालातील मुद्या क्र.२६ व २७ मधील उपस्थित मुद्यांचे मुख्य अभियंता यांचेकडून प्राप्त अनुपालन महामंडळाने नियामक मंडळाच्या मा. सचिव उपसमितीच्या बैठकीसमोर ठेवण्यासाठी दिनांक १८/०८/२०२० च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आले.

मा. सचिव उपसमितीच्या दिनांक १२/०२/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत चर्चा होऊन, नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली. मा. सचिव उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त संदर्भिय पत्र क्र.४ अन्वये प्राप्त झाले आहे.

दिनांक १२/०४/२०२१ रोजी झालेल्या नियामक मंडळाच्या ८० व्या बैठकीत पेनटाकळी प्रकल्प ता. मेहकर जि. बुलडाणा,याप्रकल्पाच्यारु.४१६.५९ कोटी किंमतीचा चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव मान्यतेचा निर्णय नियामक मंडळाचा ठराव क्र.८०/३ अन्वये झालेला असून, योजनेच्या चतुर्थ सुप्रमा बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरीता नियामक मंडळाची मान्यता देण्यात आली आहे.

संदर्भ क्र-२ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

सदर प्रकल्पाच्या तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यता किंमत रु २३०.२७ कोटीच्या तुलनेत चतुर्थ सुधारीत प्रशासकिय मान्यता अहवालाची किंमत रु १८६.३२ कोटी ने जास्त आहे किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | बाब | मंजुर तृतीय सुप्रमा किंमतीच्या तुलनेत वाढ | मंजुर तृतीय सुप्रमा किंमतीच्या तुलनेत टक्केवारी | एकूण वाढीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | दरसूचीतील बदलामुळे झालेली वाढ | ७.९१ | ३.४३ | ४.२५ |
| २ | भू संपादन किंमतीत झालेली वाढ | १३५.७६ | ५८.९५ | ७२.८६ |
| ३ | अपुऱ्या सर्वेक्षण व तरतुदी मुळे झालेली वाढ | ९.४६ | ४.११ | ५.०८ |
| ४ | इतर कारणां मुळे झालेली वाढ | १८.०५ | ७.८४ | ९.६९ |
| ५ | अनुषंगीक खर्चात झालेली वाढ | १५.१४ | ६.५७ | ८.१३ |
| | **एकूण** | **१८६.३२** | **८०.९१** | **१००** |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :-**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये पेनटाकळी प्रकल्प ता. मेहकर जि. बुलडाणा, या प्रकल्पाच्या एकूण अंदाजित रु.४१६.५९ कोटी (रु. चारशे सोळा कोटी एकोणसाठ लक्ष ) किंमतीचा खर्चास चतुर्थ सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रदान करीत आहे. यापैकी रु ३७३.३३ कोटी (रु तिनशे त्रयहत्तर कोटी तेहतीस लक्ष फक्त ) कामा प्रित्यर्थ व रु ४३.२६ कोटी (रु त्रेचाळीस कोटी सव्वीस लक्ष फक्त) अनुषंगीक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामासाठी ज.सं. वि. व सा.बां. विभागाची सन २०१७-१८ या दरसुची प्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदीचा गोषवारा सोबत परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

**ठळक बाबी :-**

| | | |
|---|---|---|
| अ) | प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र (ICA) | ९८८४ हेक्टर |
| ब) | प्रकल्पाची सिंचन क्षमता (IP) | १४३३२ हेक्टर |
| क) | प्रकल्पाचा उपयुक्त पाणी साठा | ५९.९८ दलघमी |
| ड) | प्रकल्पाचे लाभव्यय गुणोत्तर | १.६६>१.५० (मापदंड १.५० पेक्षा जास्त) |

हा निर्णय संदर्भिय शासन निर्णयातील परिच्छेद क्र १.३ नुसार नियामक मंडळाच्या दि १२/०४/२०२१ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाचे ८० व्या बैठकीतील विषय क्र ४ (ठराव क्र. ८०/३) चे अनुषगांने मा.सचिव उपसमितीने व रा.ता.स.स. च्या छाननी अहवालातील मुद्या क्र १ ते २७ मधील उपस्थित मुद्यांचे पुर्ततेच्या अटीसह महामंडळास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र आय-१६, "४७०१ मोठ्या प्रकल्पावरील भांडवली खर्च, ०१ मोठे प्रकल्प, सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००)(०५) विदर्भ पाटबंधारे विकास

महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०१ ५१०१)''या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

या प्रकल्पास प्रदान केलेली चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता ( ४ /२०२१ ) या अनुक्रमांकावर नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आली आहे.

सदर चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे. सदर सुधारीत प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

१) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/ पेनटाकळी/ (धा.क्र.७/२०१७)/८८७/२०१९, दि. २४/०९/२०१९ तसेच विपाविम नियामक मंडळाच्या दि. १२/०४/२०२१रोजी झालेल्या ८०व्या बैठकीतील ठराव क्र. ८०/३ व अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.१२/०२/२०२१ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०२१/ (८१/२०२१)/लपा, दि. २३/०३/२०२१ या तिनही विविध स्तरावर उपस्थित मुद्याच्या अनुपालनाच्या अधीन राहुन चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.अनुपालनाची संपुर्ण जवाबदारी ही मुख्य अभियंता , जलसंपदा विभाग , अमरावती यांची राहील. झालेल्या अनुपालनाच्या कार्यवाहीबाबत महामंडाळास अवगत करावे,

२) या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशी कार्यवाही पूढे चालू ठेवावी. पाचवी सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

३) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करण्यात येऊ नये.

४) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यत यावीत. पाणीसाठ्याचा सिंचनाकरीता जास्तीतजास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरीत कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

५) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर चतुर्थ प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरीक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे, वित्तीय अधिकार मर्यादा, विहीत केलेली निविदा कार्यपध्दती, यांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

६) राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समितीच्या छाननी अहवालातील मुद्या क्र २६ व २७ चे अनुपालन करण्यात यावे.

७) मा.सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन करण्यात यावे.

८) प्रकल्पाचे काम नियोजनानुसार पूर्ण करण्यात यावे.

९) सदर निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

सदर निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या Mini Web Portal वर उपलब्ध करण्यात आला आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे अध्यक्ष यांचे आदेशानुसार.

**कार्यकारी संचालक**
**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ**
**नागपूर**

**सोबत : परिशिष्ट-१**

प्रतिलिपी :- (सहपत्रासह)

१. खाजगी सचिव,मंत्री, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

२. प्रधान सचिव (ज.सं.प्र.व वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. सचिव (ज.सं.व्य.व ला.क्षे. वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), नागपूर.
६. वित्त विभाग, (व्यय - १२), मंत्रालय, मुंबई-३२.
७. नियोजन विभाग, (कार्यासन १४३४),मंत्रालय, मुंबई-३२.
८. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
९. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती.
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ कार्यालय.
११. अधीक्षक अभियंता, बुलडाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलडाणा
१२. जिल्हाधिकारी, बुलडाणा
१३. कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प पुनर्वसन विभाग, खामगांव
१४. विभागीय संपर्क अधिकारी, माहीती व जनसंपर्क संचालनालय, अमरावती.
१५. चिशा कार्यासन- विपाविमं सग्रहार्थ

**पेनटाकळी प्रकल्प ता. मेहकर जि. बुलडाणा**

या प्रकल्पास चतुर्थ सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रदान करणे बाबत. किंमत रु ४१६.५९कोटी.

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.

**महामंडळाचा निर्णय क्र. ६७ /विपाविमं/कातां.३(२)/पेनटाकळी/चतुर्थ सु.प्र.मा./ (धा.क्र.-२१ ).**

**दिनांक ३०/०४/२०२१.**

**परिशिष्ट-१**

| अ.क्र. | उपशिर्ष | एकूण किंमत (रु.कोटी) |
|---|---|---|
| १ | अ-प्राथमिक | ०.९५ |
| २ | ब- भुसंपादन | १९५.१८ |
| ३ | क-बांधकाम | ८१.७७ |
| ४ | ड- विमोचक | ८.०९ |
| ५ | ई-प्रपात | १.६४ |
| ६ | एफ- सी.डी. वर्क्स | १३.४६ |
| ७ | जी-पुल | १०.४९ |
| ८ | एच- अतिवाहक / एस्केप | ३.०० |
| ९ | के-इमारती | २.०३ |
| १० | एल-मातीकाम | २८.५७ |
| ११ | एम- वृक्षारोपण | ०.५१ |
| १२ | ओ-सकिंर्ण | ६.३८ |
| १३ | पी-देखभाल व दुरुस्ती | ३.५२ |
| १४ | क्यु- विशेष सयंत्र व हत्यारे | ०.५४ |
| १५ | आर-दळणवळण | ८.२३ |
| १६ | एक्स पर्यावरण | ०.३३ |
| १७ | व्ही- वॉटर कोर्स | ७.१० |
| १८ | डब्ल्यु र् ड्रेनेज | ०.५४ |
| १९ | इलेक्ट्रिक पोर्षण | १.०० |
| | **एकूण** | **३७३.३३** |
| २० | अनुषंगीक खर्च | ४३.२६ |
| | **एकूण** | **४१६.५९** |

**कार्यकारी संचालक**
**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ**
**नागपूर**